**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. डी. बी. सोळुंके यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

१३. माझे शिक्षण मॅट्रीकपर्यंत झाले आहे. मी पोलीस खात्यातून सध्या सेवानिवृत्त झालो आहे. मी पोलीस ठाणे गातेगाव येथे सन २००९ ते सन २०१५ पर्यंत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे लातूर येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार यांना लातूर येथून घेऊन आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि माझा मुलगा लातूर येथे राहतो. हलगरा येथील माझ्या घराचा नंबर मला आठवत नाही. माझे आणि माझ्या भावाचे वाटणीबाबत न्यायालयात वाद चालू आहेत. तो दावा आमच्या सर्व वडीलार्जित शेत मिळकती आणि घर मिळकतीबाबत वाद चालू आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, आम्हाला शेत मिळकती नाही, केवळ घर मिळकतीकरीता दावा चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे हलगरा येथे घर नाही. अर्जदाराचे लग्न मी गातेगाव येथे नोकरीत असताना झाले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या लग्नाचा खर्च गैरअर्जदार आणि त्याच्या आईने केला होता. मी लग्नातील खर्चाच्या सात लाखाचे पावत्या दाखल करु शकत नाही. अर्जदाराच्या मुलाची जन्म तारीख दिनांक १३.०७.२०१२ अशी आहे. सन २०१२ ते २०१८ या कालावधीमध्ये अर्जदार सन २०१५ पर्यंत गैरअर्जदारसोबत मुंबई येथे त्यानंतर ती माझ्याकडे सन २०१६ पासून राहत आहे. सन २०१५ ते २०१६ या कालावधीत अर्जदार ही मुंबई येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार सन २०१६ पर्यंत गैरअर्जदार सोबत राहत होती. अर्जदार माझ्याकडे सन २०१६ मध्ये आठव्या महिन्यात आली होती ती किती तारखेला आली ती तारीख मला आठवत नाही. अर्जदार स्वतः माहेरी आली होती. गैरअर्जदार बेपत्ता असल्याने अर्जदार माहेरी आली होती. अर्जदारने पोलीस स्टेशनला गैरअर्जदाराच्या बेपत्ता असण्याबाबत दाखल केलेल्या केसचे

कागदपत्र दाखल केलेले आहेत. गैरअर्जदार बेपत्ता झाल्यानंतर मी त्यांची चौकशी केली होती. ती चौकशी त्याच्या भावाकडे, चुलत्याकडे आणि नातेवाईकांकडे दिली. मी चौकशीसाठी मुंबईला गेलो होतो. मी मुंबईला चौकशीकरीता किती तारखेला गेलो होतो ती तारीख मला सांगता येत नाही. जावाई बेपत्ता असल्याचे मला अर्जदाराने सांगितले. गैरअर्जदार घरातून निघून गेल्यानंतर मी दुसऱ्या दिवशी गेलो. मी चौकशीसाठी पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी गैरअर्जदाराचा शोध घेतो असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः पोलीस खात्यात असल्यामुळे त्या माझ्या परिस्थितीचा फायदा घेऊन मी गैरअर्जदाराविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः पोलीस असल्यामुळे गैरअर्जदाराला सतत पोलीसी दबावात ठेवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः पोलीस असल्याने गैरअर्जदाराला तुला दाखवितो अशी धमकी देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या चिथावणीवरुन माझ्या मुलीने गैरअर्जदाराला त्रास दिला.

१४. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दबावामुळे अर्जदार व गैरअर्जदार विभक्त राहत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या धमकीमुळे अर्जदार व गैरअर्जदाराचा संसार मोडला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विभक्त राहण्यास मी कारणीभूत आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराची आई वयोवृध्द आहे. रुक्मीणबाई ह्या गैरअर्जदाराचे आईचे वय अंदाजे ६० असावे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराची आई वयोवृध्द असून ती सतत आजारी असते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार व त्याचे भावाचे कुटुंब विभक्त आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराची बहीण वसुधादेवी ही तिच्या पतीच्या घरी राहते. हे म्हणणे खरे नाही

की, गैरअर्जदार आणि त्यांचे चुलते यांचे कुटुंब विभक्त आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारविरुध्द कोणतेही आरोप होऊ नये म्हणून खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रतील कथन अर्जदाराच्या सांगण्यावरुन लिहिली आहे.

**गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत उलट तपास तहकूब.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2025.09.24 17:27:31 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

**दिनांक २४/०९/२०२५.**
**ठिकाण निलंगा.**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा**
**जिल्हा लातूर.**
**न्यायालय क्र.१.**